ठळक बातम्या

- लोकसभेची बैठक ३० नोव्हेंबरपासून, तर राज्यसभेची बैठक २ डिसेंबरपासून होणार, विशेष बैठकीच्या पार्श्वभूमीवर नवी दिल्लीत आज केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक

- भारत आणि अमेरिका व्यापार करार शेवटच्या टप्प्यात असून लवकरच त्याला अंतिम स्वरुप दिलं जाईल, अशी केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्र्यांची माहिती

- हिंद महासागराभोवती जागतिक व्यापार, उर्जा संरक्षण, कनेक्टिविटी आणि आर्थिक समृद्धी एकवटली असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांचं प्रतिपादन

- महिला आशियाई हॉकी अजिंक्यपद चषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत आज भारतासमोर मलेशियाचं आव्हान

आणि

- भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात पहिल्या दिवसअखेर न्यूझीलंडच्या ५ बाद २४६ धावा

<><><><><>

लोकसभेची विशेष बैठक ३० नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजल्यापासून, तर राज्यसभेची विशेष बैठक २ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजल्यापासून भरणार आहे. ठरल्याप्रमाणे कामकाज झाल्यास दोन्ही सदनांचं कामकाज ३ डिसेंबर रोजी संपेल. विशेष बैठकीदरम्यान दोन्ही सदनांमध्ये प्रश्नकाल, शून्य प्रहर आणि खासगी सदस्यांचं कामकाज होणार नाही. अत्यावश्यक सरकारी कामकाज पूर्ण करण्यासाठी ही विशेष बैठक होमार आहे. पावसाळी अधिवेशनाचं कामकाज १३ ऑगस्ट रोजी संपलं असलं, तरी लोकसभा आणि राज्यसभेचं कामकाज संस्थगित झालेलं नाही. संसदेच्या विशेष बैठकीच्या पार्श्वभूमीवर, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक सेवातीर्थ इथं होत आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं सर्व लोकसभा खासदारांना व्हिप जारी केला आहे. ३० नोव्हेंबर ते ४ डिसेंबर या कालावधीत सर्व खासदारांनी लोकसभेत हजर राहावं आणि पक्षाच्या भूमिकेला पाठिंबा द्यावा, असं या व्हिपमध्ये म्हटलं आहे.

<><><><><><>

भारत आणि अमेरिका यांच्यामधला व्यापार करार आता शेवटच्या टप्प्यात असून लवकरच त्याला अंतिम स्वरुप दिलं जाईल, असं प्रतिपादन केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी केलं आहे. ते नवी दिल्लीत इंडिया डेट कॅपिटल मार्केट समिटमध्ये बोलत होते. काही कारणांमुळे या कराराला विलंब झाला, पण आता तो अंतिम टप्प्यात आल्याचं त्यांनी नमूद केलं. भारत आणि युरोपीय संघ यामधल्या मुक्त व्यापार करारावर या वर्षअखेरीपर्यत स्वाक्षऱ्या होऊन तो पुढच्या वर्षी मार्च-एप्रिलपर्यंत अंमलात येईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. गेल्या ५ वर्षात ३८ विकसित देशांशी भारताने ९ मुक्त व्यापार करार केले आहेत, ज्यामुळे ७० मिलियन डॉलर सकल राष्ट्रीय उत्पादन असलेल्या अर्थव्यवस्थांची बाजारपेठ भारतासाठी खुली झाली आहे, असं गोयल यांनी सांगितलं. तसंच, सध्या आणखी ८ ते ९ मुक्त व्यापार करारांबाबत वाटाघाटी सुरू असून, ते पूर्ण झाल्यास भारताला उपलब्ध होणाऱ्या बाजारपेठेचा विस्तार ८५ ट्रिलियन डॉलरपर्यंत होऊ शकतो, असंही त्यांनी नमूद केलं. जागतिक अस्थिरता, संघर्ष, तेलाच्या किंमतीतले चढउतार आणि आयात शुल्काशी संबंधित अडचणी असूनही भारतानं वाढीचा दर कायम राखला आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधलं. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या ७ महिन्यांमध्ये भारताची निर्यात साधारण ५७० बिलियन डॉलरवर गेली असून १ ट्रिलियन डॉलर्स वार्षिक निर्यातीचं उद्दिष्ट साध्य होण्याच्या मार्गावर भारत अग्रेसर आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

<><><><><><>

विजेची वाढती मागणी भारत यशस्वीरीत्या पूर्ण करत असून देशाचं ऊर्जाक्षेत्र स्वावलंबी होत आहे, तसंच शेजारी देशांना निर्यात करता येण्याजोगी अतिरिक्त ऊर्जाही भारत निर्माण करत आहे, असं प्रतिपादन केंद्रीय ऊर्जामंत्री मनोहर लाल यांनी केलं आहे. नवी दिल्लीत ऊर्जामंत्र्यांच्या परिषदेत ते बोलत होते. येत्या १० ते ११ वर्षांमध्ये नवीकरणीय ऊर्जास्रोतांद्वारे ५०० गीगावॅट ऊर्जानिर्मितीचं उद्दिष्ट भारतानं ठेवल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

हिंद महासागराभोवती जागतिक व्यापार, ऊर्जा संरक्षण, कनेक्टिविटी आणि आर्थिक समृद्धी एकवटलेली आहे असं प्रतिपादन परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी केलं आहे. नवी दिल्लीत आज भारताच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या इंडियन ओशन रिम असोसिएशन अर्थात आयोरा या संघटनेच्या मंत्रीगटाच्या बैठकीच्या आरंभी ते बोलत होते. जागतिक स्तरावर ठळक बदल घडून येत असतानाच्या या काळात आयोराने आपला एकत्रित आवाज बुलंद करत सर्वसमावेशक स्थानिक मंच म्हणून आपली भूमिका बजावली पाहिजे असं ते म्हणाले. यासाठी सदस्य देशांमध्ये सहकार्य असायला हवं असं नमूद करतानाच भारताचा यासंदर्भातला दृष्टिकोन या भागातल्या विकासासाठी परस्परावलंबी समग्र वाटचाल म्हणजेच 'महासागर' या संकल्पनेतून दिसून येतो असं त्यांनी सांगितलं. ही संकल्पना प्रत्यक्षात येण्यासाठी सदस्य देशांमध्ये सहकार्य बळकट करणं गरजेचं आहे, असं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

नवी दिल्ली इथं आज ४५व्या भारतीय आंतरराष्ट्रीय व्यापार परिषदेचा समारोप होणार आहे. भारतीय व्यापार प्रोत्साहन संस्थेच्या वतीनं दरवर्षी या परिषदेचं आयोजन केलं जातं. 'विकास आणि परंपरा' अशी यंदाच्या परिषदेची संकल्पना होती. सहभागींपैकी काही उत्कृष्ट राज्यांना काल पुरस्कारानं गौरवण्यात आलं.

महाराष्ट्रासह बिहार, राजस्थान, उत्तरप्रदेश यांनी भागीदार राज्यं म्हणून या परिषदेत सहभाग नोंदवला.

<><><><><>

महिला आशियाई हॉकी अजिंक्यपद चषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत आज भारताचा सामना मलेशियाशी होणार आहे. संध्याकाळी ७ वाजता भोपाळ इथं सामन्याला सुरुवात होईल. भारतानं साखळी फेरीत सगळे पाचही सामने जिंकून १५ गुणांसह स्पर्धेत अव्वल स्थान मिळवलं आहे. यापूर्वी २०१६, २०२३ आणि २०२४ मध्ये या स्पर्धेचं अजिंक्यपद पटाकवलं होतं. उपांत्य फेरीच्या इतर सामन्यांमध्ये दक्षिण कोरियासमोर थायलंडचं, तर जपानसमोर चीनचं आव्हान असेल.

<><><><><>

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्याला आज क्राइस्टचर्च इथं सुरुवात झाली. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. पहिल्या दिवशीचा खेळ संपला, तेव्हा न्यूझीलंडनं ५ गडी गमावून २४६ धावा केल्या होत्या. या सामन्यात भारतानं प्रसिद्ध कृष्णा ऐवजी वेगवान गोलंदाज गुरनूर ब्रारला पदार्पणाची संधी दिली आहे.

<><><><><>

जिनिव्हा इथं झालेल्या फिडे विश्वचषक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेच्या तिसऱ्या डावात काल भारताचा ग्रँडमास्टर डी गुकेश यानं काळ्या मोहऱ्यांनी खेळून जावोखीर सिंदारोव्ह याला बरोबरीत रोखलं. सध्या दोघांच्या खात्यात प्रत्येकी दीड गुण जमा आहे. १४ डावांच्या या सामन्यात आणखी ११ डाव शिल्लक आहेत. स्पर्धेच्या नियमानुसार जो खेळाडू प्रथम ७.५ गुण मिळवेल तो विजेता ठरेल. १४ डावांनंतरही ७-७ अशी बरोबरी झाली, तर विजेता निश्चित करण्यासाठी कमी गुणांचे आणखी काही सामने खेळले जातील.

<><><><><>

गोव्यात सुरू असलेल्या इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या आजच्या ८व्या दिवशी चित्रपटांचं प्रदर्शन, या क्षेत्रातल्या दिग्गजांकडून मार्गदर्शन असे भरगच्च कार्यक्रम होत आहेत. 'Legendary २५' या कार्यक्रमांतर्गत फरहान अख्तर, आशुतोष गोवारीकर आणि मधुर भांडारकर हे तिघे २००१ मध्ये प्रदर्शित झालेल्या ३ चित्रपटांवर चर्चा करणार आहेत.

<><><><><>

महादेव बेटिंग ॲप प्रकरणातला मुख्य आरोपी सौरभ चंद्राकर याच्याकडून न्यायाधीश आणि सरकारी वकिलांना लाच देण्यासाठी १५ कोटी रुपये घेणाऱ्या वकिलाला अंतरिम दिलासा द्यायला सर्वोच्च न्यायालयानं नकार दिला आहे. त्याला अटक करण्याची परवानगी सक्तवसुली संचालनालयाला देणाऱ्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला या वकिलानं सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. त्यावर न्यायालयानं नोटिस जारी केली.

<><><><><>

अत्याधुनिक संरक्षण सामग्री क्षेत्रातलं सहउत्पादन आणि सहनिर्मितीचा वेग वाढवायला भारत आणि संयुक्त अरब अमिरातीनं सहमती दर्शवली आहे. भारत-यूएई संयुक्त संरक्षण सहकार्य समितीची १४वी बैठक काल अबुधाबीत झाली. भारताच्या बाजूने संरक्षण सचिव राजेश कुमार आणि संयुक्त अरब अमिरातीच्या संरक्षण मंत्रालयाचे अवर सचिव लेफ्टनंट जनरल इब्राहिम नासर एम. अल अलावी, या बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. संरक्षण उद्योग, नवोन्मेष आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर आणि लष्करी प्रशिक्षण आणि सागरी सुरक्षा क्षेत्रांमधले द्विपक्षीय संबंध बळकट करण्यावर दोन्ही बाजूंनी संमती दिली.

<><><><><>

पूर्व राजस्थानात उद्यापर्यंत थंडीच्या लाटेचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. दिल्ली, पंजाब, हरियाणा, चंडीगढ, हिमाचल प्रदेश आणि उत्तर प्रदेश, तसंच ईशान्य भारतात आज धुकं राहील.

//<><><><><><>//